ISSN 2230-7850 Impact Factor : 4.1625 (UIF) Volume - 6 | Issue - 4 | May - 2016

Indian Streams Research Journal

संत तुकारामांची भक्ती संकल्पना आणि विद्रोह

संजय पांडुरंग चौधरी
भारत महाविद्यालय,जेऊर

सारांश:

संत तुकाराम आपल्या कार्यकर्तृत्वाने वारकरी संप्रदायाचे कळस झाले. त्यात त्यांच्या भक्ति संकल्पनेचे वेगळे महत्त्व आहे. 'ईश्वराजवळ मोक्षाचे गाठोडे' नाही हे तुकारामांना माहीत आहे. तरीसुध्दा आपली मूळचीच मुक्तावस्था समजण्यासाठी ईश्वरकृपेची आवश्यकता भक्तियोगात मानली जाते.भक्ति हे तुकोबांच्या जीवनाचे अविभाज्य अंग आहे.आत्मसाक्षात्कारा पूर्वी आणि नंतर ज्ञानोत्तर अवस्थेतही तुकारामांनी आमरण भक्तियोगाचे अनुसरण केले. भक्तिरसाने परिपूर्ण असलेल्या त्यांच्या उत्स्फूर्त अभंग रचनेव्दारे त्यांचे भक्तिकार्य समजून घेता येते.

बीजसंज्ञा: संत तुकाराम

प्रस्तावना:

ज्ञानोत्तर अवस्थेत म्हणजे विश्वरुप विठ्ठलाचे दर्शन झाल्यावर तुकारामांनी भक्तितत्त्वाचे निरुपण केले आहे त्यात व्दैतभावाला थारा नाही.

देवभक्तगण। तुका म्हणे नव्हे भिन्न
तुका म्हणे अंगे। एक एकाचिया संगे

यासारख्या त्यांच्या अभंगातून देव भक्तांची एकरुपता व्यक्त होते. विश्वरुप देव आणि भक्त यांच्यात तत्त्वत: भेद नसतो. ते दोघे तादात्म्य संबंधाने राहतात. ज्ञानपूर्व अवस्थेत तुकाराम देव - भक्त भेदाविषयी बोलले आहेत पण आता त्याची आवड राहिलेली नाही आता अभेदाची आवडी आहे असा आपला अनुभव ते मांडतात. देव आणि भक्त या दोघांतील भेद कल्पित आहे. जीवाशीवाचे तादात्म्य अनुभवून जी सेवा घडते ती सेवा म्हणजे भक्ती होय असे तुकोबांना अभिप्रेत आहे.

तू माझा आकार। मी तो तूची निर्धार
मी तुजमाजी देवा। घेसी माझ्या अंगे सेवा

अशाप्रकारे देव - भक्त परस्परांशी संबध्द असल्याचे तुकोबा सांगतात. देव-भक्ताची अभेद्य स्थिती तुकोबा केवळ वर्णन करीत नाहीत तर ती त्यांनी प्रत्यक्ष अनुभवलेली आहे.

इंधन ते आगी संयोगाच्या गुणे। सागर दर्शने ओहोळ तोचि।
तुका म्हणे माझे साक्षीचे वचन। येथे तो कारण शुध्द भाव।।

असा आपला अनुभव व्यक्त केला आहे. श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य आणि आत्मनिवेदन ही नवविधा भक्ती मानली गेली आहे. या नवविधा भक्तीच्या संबंधाने तुकारामांचा पुढील अभंग पाहण्यासारखा आहे.

अर्चन वंदन नवविधा भक्ती । दया क्षमा शांती तये ठायी
तये गावी नाही दु:खाची वसति। अवघाचि मूर्ती नारायण
अवघेंचि झाले सोवळे ब्रह्मांड। विटाळाचे तोंड न देखती

नवविधा भक्तीमध्ये कर्मकांड नाकारून तुकोबा सर्वाभूती नारायण पाहतात. त्याठिकाणी दया क्षमा व शांती तर असतेच पण या भक्तीमध्ये स्पृश्य, अस्पृश्य, विटाळ सोवळे या कालबाह्य रुढीचे तोंडही पाहण्याचे कारण नसल्याचे तेआग्रहाने प्रतिपादन करतात. परमेश्वराला अनन्यभावे शरण गेलेल्या भक्ताच्या ठिकाणी आपपरभाव नसतो. अत्यंत नम्र असलेला हा भक्त अहंकाराच्या हाती कधीच सापडत नाही. भक्ताच्या अंगी ज्वालेप्रमाणे विवेकासह वैराग्याचे बळ असणे आवश्यक

आहे. प्रेमपूर्वक अनुसरलेल्या भक्तिप्रेमाचे सुख शास्त्री, पंडितांना, ग्रंथाचे शुष्क वाचन करणाज्यांना मिळत नाही. दीर्घकाळ, अखंड, श्रध्दापूर्वक स्वीकारलेल्या शुध्द स्वकर्माचरणाने विश्वरुप नारायण कृपा करील तरच भक्तिसुखाचे रहस्य कळून येईल असे तुकाराम निक्षून सांगतात. दगडांना शेंदूर फासून त्याची पूजा करावी हे तुकोबांना अजिबात मान्य नाही. 'सेंदरी हे दैवते। कोण पुजी ती भुते खेते' अशा परखड शब्दांत तुकारामांनी अशा प्रकारांचा अधिक्षेप केला आहे. त्याचप्रमाणे पुण्य जोडण्याचा आणि पापक्षालनाच्या हेतूने तीर्थाच्या ठिकाणी गर्दी करणाज्यांसाठी तुकोबा सांगतात.

माय बाप केवळ काशी। तेणे न वजावे तीर्थासी
तीर्थी धोंडा आणि पाणी। देव रोकडा सज्जनी।।

देव दगडात नसून सज्जनांमध्ये असतो हा महत्त्वपूर्ण विचार ते मांडतात. भक्तिपंथाचे अनुसरुन करण्यासाठी आश्रमधर्माचा त्याग करण्याची आवश्यकता नाही. पण मन निर्विषय करण्याची गरज प्रतिपादन करतात. हटमार्ग, योगमार्ग यांना निषेध करुन नामसंकीर्तनाचा सुलभ, सोपा, परंपरागत मार्ग अनुसरणे हिताचे असल्याचे सांगतात.

नाही देवापासी मोक्षाचे गाठोडे। आणून निराळे द्यावे हाती
इंद्रियाचा जय साधुनिया मन। निर्विषय कारण असे तिथे

अशा प्रकारे मोक्षाची भ्रामकता जाणली असल्यामुळे तुकोबा मुक्ती ऐवजी भक्तीमार्गाची निवड करतात आणि त्याचे महत्व विशद करतात.

समाजमनातील भक्तिविषयीचा खरा अर्थ लुप्त होऊन लोक विषयलोभी झालेले आहेत. भक्तिविषयक विपरीत कल्पनांनी आणि कर्मकांडी साधनांनी भक्मिमार्ग मलीन केलेला आहे. अशावेळी ख-या खोटयाचा निवाडा करण्यासाठी आणि भक्तीचा डांगोरा पिटण्यासाठी आपण आलो असल्याचे सांगतात. स्वीकारलेले काम निष्ठापूर्वक करणे ही देखील भक्ती असल्यामुळे स्वीकारलेल्या कामात गबाळेपण (ढिलाई) आम्हास मान्य नाही.

तुका म्हणे नये आम्हा। कामापुढे गबाळ

तुकारामांना अपेक्षित असलेली भक्ती केवळ परमेश्वर प्राप्तीची पारमार्थिक भक्ती नाही तिला लौकिक व्यवहाराचे अंग आहे पण या गोष्टीकडे जावे तितके लक्ष न गेल्याने अनेक गैरसमज निर्माण झालेले आहेत.ती भक्ती केवळ पांडुरंगाची किंवा विठ्ठलाची राहत नसून विश्वव्यापक परमेश्वराची होते. विश्वात्मक देवाच्या उपासनेकरिता केलेले प्रतीक म्हणजे विठ्ठलमूर्ती असे नामदेवांपासून सर्व संत सांगत आले आहेत.

ज्या परमेश्वराची भक्ती करण्याचे तुकोबा सांगतात तो परमेश्वर सर्व प्राणीमात्रात असल्याने त्याच्याशी त्याच भावनेने वागणे ख-या भक्तीसाठी आवश्यक आहे. माणसामाणसांतील व्यवहार प्रामाणिकपणाचा व प्रेमाचा व्हावा. समाज व्यवहाराचे शुद्धीकरण व्हावे ही यामागील तत्त्वे लक्षात घेतली तर या भक्तितत्त्वाचे महत्त्व कळून येईल.

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेद भ्रम अमंगळ।
आइका जी तुम्ही भक्त भागवत। कराल ते हित सत्य करा।
कोणाहि जीवाचा न घडो मत्सर। वर्म सर्वेश्वर पूजनाचे।
तुका म्हणे एका देहाचे अवयव। सुख दुःख जीव भोग पावे।।

परस्त्री, परद्रव्य यांची अभिलाषा न बाळगता दया, क्षमा, शांती अंगीकारुन कामक्रोधादी षड्विकारांचा त्याग करुन नामस्मरणाचा मार्ग अनुसरावा. तुका म्हणे देव जोडे याचसाठी। आणिक ते आटी न लगे कांही व्यवहारात अशा रीतीने वागल्यास ईश्वराची प्राप्ती होते त्या करिता आणखी आटापिटा काही करावी लागत नाही. तुकोबाची भक्ती म्हणजे व्यावहारिक नीती आहे, हेच यावरुन लक्षात येते.

याच अंगाने तुकोबाच्या कीर्तनभक्तीचा विचार पाहण्यासारखा आहे. सेवाभाव जागृत करण्यासाठी, जागृत केलेला सेवाभाव विश्वसेवेत लावण्यासाठी, जीवाशिवाचे अनन्यसंबंध प्रत्यक्ष अनुभूतीस आणून देण्यासाठी विश्वरुप विठ्ठलाची स्तुती करणे कीर्तनभक्तीमध्ये तुकोबांना अभिप्रेत आहे. देहाविषयी अनासक्त होऊन, मान, दंभ बाजूला सारुन सीमित स्वार्थाच्या उपाधीपासून अलिप्त राहून कीर्तन करावे असे तुकाराम म्हणतात. कीर्तन सेवेमध्ये मग्न झालेल्यांचा पूर्वीचा सीमित भाव मावळून जातो व तो या तद्रुपतेतून विश्वाचा सोयरा होतो.

कीर्तन चांग कीर्तन चांग। होय अंग हरिरुप । प्रेमे छंदे नाचे डोले, हारपले देहभाव एकदेशी जीवकळा।' हा सकला सोयरा सकळ जनता जनार्धनाला स्वतःशी जोडून घेण्याचा, त्यांच्याशी एकरुप होण्याचा कीर्तन हा उत्तम मार्ग ते मानतात.पोट भरण्याचे साधन म्हणून संत महंतांच्या चमत्कार कथा सांगून द्रव्य लालसेने केलेल्या कीर्तनाचे बाजारु स्वरुप तुकोबांना मान्य नाही.

उभ्या बाजारात कथा। हे तो नावडे पंढरीनाथा
अवघे पोटासाठी सोंग। तेथे कैसा पांडुरंग
लावी अनुसंधान। काही देईल म्हणून
काय केले रांड लेका। तुला राजी नाही तुका।

कीर्तन सेवेचा बाजार मांडणाज्यांवर ताशेरे ओढताना तुकोबा लिहितात.

आशाबध्द वक्ता। भय श्रोतीयांचे चित्ता
झाले लोभाचे मांजर। भिक मागे दारोदार
काय गातो नाही ठावे। तोंड वासोनि म्हणतो द्यावे
माप आणि गोणी । तुका म्हणे रिती दोन्ही।।

कीर्तनासाठी एक आचारसंहिता तुकारामांनी सांगितली आहे.

जेथे कीर्तन करावे। तेथे अन्न न सेवावे।।

बुका लावू नये भाळा। माळ घालो नये गळा।।
तट्टावृषभासी दाणा। तृण मागो नये जाणा।।
तुका म्हणे द्रव्य घेती। देती तेही नरका जाती।।

पोट भरण्याचे, धन-मान संपादन करण्याचे साधन म्हणून केले जाणारे कीर्तन तुकारामांना खरे वाटत नाही. 'कीर्तन करावे। तैसे करुनी दावावे।।' जसे कीर्तनामध्ये बोलावे तसे करुन दाखवावे वागून दाखवावे हे अपेक्षित आहे.कीर्तन भक्तीतून समाजाला 'टाळकुटे बनविणे, निष्क्रीय बनविणे अभिप्रेत नसून समाजाला स्वकर्तव्यारुढ करणे हे उद्दिष्ट तुकारामांनी समोर ठेवले होते.

तुकारामांच्या अभंगाचा धांडोळा घेतला असता ज्ञानपूर्व अवस्थेत परंपरावादी, भावुक, व्रतवैकल्य, तीर्थयात्रा करणारे, प्रतिमापूजन करणारे, दर्शनाची ओढ लागलेले, परमेश्वराच्या भेटीच्या ओढीतून त्यांच्याशीच भांडण करणारे तुकाराम ज्ञानोत्तर अवस्थेत या सा-यांना छेद देऊन बुद्धि प्रामाण्यवादी, विज्ञाननिष्ठ पद्धतीने प्रकटतात. भक्तिविषयीच्या पारंपरिक कालबाह्य रुढीं विरुध्द कठोर लोकशिक्षकाची भूमिका वठवतात व धर्म,भक्ति,ज्ञान,कर्म,पूजा यांचे अवडंबर माजविणाज्यां विरुध्द धर्मयुद्ध पुकारतात.

तुकारामाच्या व्यक्तिमत्त्वामध्ये कवी, संत, भक्त, प्रतिभावंत याबरोबरच विद्रोहीचा निखारा प्रकर्षाने जाणवतो."समाज मनावर प्रभाव गाजवित असलेल्या एका उद्दाम, अहंकारी आणि धर्माच्या नावावर अनीतीचा बाजार मांडणाज्या धर्मसत्तेला कडवे आव्हान देणारा हा संत म्हणजे एक महान लढवय्या होता.अंतरंगाने किडक्या परंतु बहिरंगाने अत्यंत प्रबळ व मजबूत असलेल्या एका समाज व्यवस्थेच्या मुळाशी निर्भयपणे सुरुंग लावण्याचे काम आयुष्यभर केले. एका अनैतिक व्यवस्थेविरुध्द प्रचंड विद्रोह केला."[१] तुकारामांनी आपल्या उत्तर आयुष्यातील २० वर्षात वैदिक पंडित, याज्ञिक, योगी, गुरु, भोंदूगिरी अशा नावांनी व रुपांनी वावरणाज्या पण प्रत्यक्षात भोंदूगिरी करणाज्या लोकांना पळता भुई थोडी केली. शब्दशस्त्रांनी त्यांना घायाळ करुन अशा छळवाद्यांचे थोबाड फोडण्याची भाषा फक्त तुकारामांनीच केली. धर्माच्या नावावर अधर्म माजविणारे समाजाची दिशाभूल करणारे अन्यायाचे ठेकेदार तत्कालीन समाजात मोठ्या प्रमाणावर होती. धर्माचे आणि परंपरेचे बळ लाभलेल्या या लोकांच्या बहुमताची पर्वा न करता;

सत्य असत्या मन केले ग्वाही। मानियले नाही बहुमता।।

या प्रकाराने धर्ममार्तंडाना आव्हान दिले.आणि स्वत:च्या भूमिकेने, स्वत:च्या हाताने, स्वत:च्या कुटुंबावर संकट ओढवून घेणारे तुकाराम ख-या अर्थाने मराठी संत परंपरेची मशाल होते. समाजातील धनाढ्य,

ज्ञानाढ्य व बलाढ्य लोकांबरोबर तुकारामांनी आयुष्यभर संघर्ष केला.

समाज व्यवस्थेमध्ये जे-जे गैर वाटले त्या सगळयां विरोधात तुकारामांनी युध्दच पुकारले. 'रात्रंदिन आम्हा युध्दाचा प्रसंग' असे लिहणा-या तुकारामांनी आपल्या युध्दमय जीवनाचा इतिहास अभंगातून व्यक्त केला आहे. ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य या तीन वर्णातील पुरुषांनाच वेदाभ्यास करण्याचा अधिकार तत्कालीन समाज व्यवस्थेने दिला होता. ज्यांना वेदांचा अधिकार नसतो. त्यांनी इतरांची सेवाच करावी. कलियुगामध्ये क्षत्रिय व वैश्य हे दोन वर्ण शिल्लक राहिले नसल्याने ब्राह्मण वगळता ठरलेले सर्व शुद्र आणि शूद्रांना वेदांचा अधिकार नसतो. अशा समाजधारणा हेतुपुरस्पर बनविण्यात आली होती. हा प्रकार म्हणजे ज्ञानाची विटंबना असल्याचे तुकारामांनी ओळखले आणि याला आव्हान देऊन -

वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा। येरांनी वाहावा भार माथा।।

ही नवी भूमिका त्यांनी घेतली, वेदांचे पाठांतर करणारा ब्रह्मवृंद म्हणजे वांझ स्त्रीने पोटावर चिरगुटे बांधून आपण गरोदर आहोत असे सांगण्यासारखे आहेत. तुकारामांचे हे विद्रोही कार्य असामान्य स्वरुपाचे होते. "ज्याला मुळी वेदाचे एक अक्षर उच्चारण्याचा अधिकार नाही, अशा एका शूद्राने आपल्या ज्ञानाची शंका घेतल्याचे पाहून त्यांच्या मेंदूला झिर्णाझिण्याही आल्या असतील व त्यांचे विषारी दात सळसळलेली असतील हे उघड आहे."[२] शिकल्या बोलाचे वाद सांगणाज्या पडिक पंडिताला कथा सांगण्याचा जगाला ज्ञान सांगण्याचा अधिकार नाही, हेही तुकारामांनी ठणकावून सांगितले. अल्पविद्या असूनही गर्व शिरोमणी असलेल्या धर्ममार्तंडाच्या आर्थिक प्राप्तीवर तुकारामांच्या या विद्रोहाचा विपरीत परिणाम झाला. तुकारामाविषयी त्यांच्या मनात द्वेषाच्या ज्वाला भडकून उठल्या. तुकारामांच्या या प्रखर विद्रोही भूमिकेमुळे त्यांना अखेरपर्यंत धर्ममार्तडांचा छळ सहन करावा लागला.

'अहंब्रह्मास्मि' म्हणणाज्याला भक्तीचे रहस्य कळत नाही. ज्याला भक्तीचा महिमा कळत नाही, त्याने ब्रह्मज्ञान जगाला सांगू नये; ही भूमिका तुकारामांनी घेतली आणि ब्रह्मज्ञानाला तुच्छ लेखले. परमेश्वराची कृपा हेच ब्रह्मज्ञान होय आणि ज्या गावात हरीचे दास राहतात त्यांच्या घरोघरी ब्रह्मज्ञान असते असा विचार तुकारामांनी मांडून तथाकथित ब्रह्मज्ञान्यांची मक्तेदारी मोडीत काढली."मी वेदवक्त्या पंडितांना मानत व भीत नाही आणि मी वेदांचा अंकित नाही, ही तुकारामांची घोषणा म्हणजे भारताच्या सामाजिक इतिहासातील बौद्धिक व मानसिक स्वातंत्र्याचा उद्घोष होय".[३]

तुकारामाच्या विद्रोही व्यक्तिमत्त्वाचा व कार्याचा आढावा घेताना त्यांची गुरु-शिष्य परंपरेविषयीची विद्रोही भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. 'गुरु- शिष्य पण। हे तो अधम लक्षण।' ही तुकारामांची भूमिका असल्याने ढोंगबाजी करणा-या गुरु - शिष्यावर तुकारामांनी आपल्या अभंगाच्या माध्यमातून हल्ला केल्याचे दिसते. आपल्या भोवती शिष्यांचे गबाळ जमविणारा ढोंगी गुरु बाहेरुन कितीही सोंग करत असला तरी आतून तो पोकळ असतो असा गुरु आणि त्याचे शिष्य दोघेही नरकाला जातात; असे तुकारामाने सांगितले आहे. गुरु - शिष्य संबंधाविषयीची तुकारामांची धारणा त्यांच्या अनेक अभंगातून स्पष्ट होते. तुकारामांनी त्यांच्या वास्तविक आयुष्यामध्ये गुरु म्हणून कोणाचा स्वीकार केला नाही आणि कोणाचे शिष्यत्व पत्करले नाही आणि कोणाला शिष्यही केले नाही. तुकारामांच्या गुरु विषयीचा "सदगुरु रायें कृपा मज केली"। हा अभंग बाबाजींना तुकारामांचा गुरु ठरविणारा अभंग प्रक्षिप्त असल्याचे मत पां.बा.कवडे यांनी आपल्या तुकाराम चरित्रात मत व्यक्त केले आहे.

'माझ्या विठोबांचा कैसा प्रेमभाव। आपणचि शिष्य होय गुरु।।'

ही तुकारामांची गुरुविषयक धारणा होती."मठ, संप्रदाय आणि गुरुबाजांच्या विरोधात तुकोबांनी फार मोठे बंड पुकारले होते. तुकोबांची ही कृती जाणीवपूर्वक होती. त्यांच्या या कृतीमागे प्राचीन व कालबाह्य अशा शोषण परंपरेला शह देण्याची भावना होती".[४] भक्त तुकाराम म्हणून जेव्हा आपण त्यांच्या कार्याकडे पाहतो तेव्हा

वैदिक परंपरेतील प्रथांना विरोध करीत भक्तीचा सोपा मार्ग सांगताना सामान्य जनांना समतेच्या दिशेने नेण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी केले आहे ; म्हणूनच ते वारकरी संप्रदायाचा कळस होऊ शकले. भक्त तुकाराम हा संत आणि सामान्य माणूस यांच्या मधला अत्यंत महत्त्वाचा दुवा म्हणून नोंद घेणे गरजेचे आहे.

संदर्भ-

१. साळुंखे, आ.ह. : विद्रोही तुकाराम, लोकायत प्रकाशन,सातारा, दु.आ.१९९९, पृष्ठ : १०.
२. तत्रैव : पृष्ठ : ४०.
३. तत्रैव : पृष्ठ : ६१.
४. सानप, किशोर : समग्र तुकाराम दर्शन,विजय प्रकाशन,नागपूर, प.आ.१ मे, २००८,पृष्ठ - ११८.